दिनांक : ०३/०४/२०२५

# निविदा सूचना

संस्थेच्या नायगाव व लोणारवाडी प्रक्षेत्रावरील २१.१८ एकर क्षेत्रातील आंबा देखाभाल/काढणी/विक्री साठी अनुभवी ठेकेदारांकडून/व्यापा–यांकडून निविदा मागवण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | निविदा फार्म फी (Tender Form Fees) | इसारा रक्कम (EMD) |
|---|---|---|---|
| १ | नायगाव व लोणारवाडी २१.१८ क्षेत्रातील आंबा देखाभाल/काढणी/विक्री करणे. (कालावधी दि. १५/०४/२०२५ ते दि. १५/०७/२०२५) | रू. ५००/– | रू. २५,०००/– |

टेंडर जमा करण्याची शेवटची तारीख दि.१०/०४/२०२५ राहिल. इच्छुक व्यक्तींनी अधिक महितीसाठी संस्थेच्या नायगाव व लोणारवाडी प्रक्षेत्रावर किंवा मांजरी बु., येथील ऑफीसला भेट देवू शकतात. टेंडर फॉर्म संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. टेंडर स्विकारणे अगर नाकारण्याचा संपूर्ण अधिकार इन्स्टिट्यूटने राखून ठेवलेला आहे.

**महासंचालक**
**व्ही.एस.आय., पुणे**

वसंतदादा शुगर इन्टिटयूट, पुणे तर्फे

टेंडर फॉर्म क्रमांक :

१. नांव
२. पूर्ण पत्ता
३. मोबाईल क्रमांक
४. पॅन क्रमांक
५. सर्व्हिस टॅक्स क्रमांक
६. आधार कार्ड नं.

..........................................................................................................................

दिनांक :

प्रति,
मा.महासंचालक
वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट
मांजरी बु., ता.हवेली, जि.पुणे ४१२ ३०७

मा.महोदय,

आपल्या दिनांक .......................... रोजीच्या जाहिरातीस अनुसरून मी/आम्ही इन्स्टिटयूट संस्थेच्या नायगांव व लोणारवाडी प्रक्षेत्रावरील २१.१८ क्षेत्रातील आंबा देखभाल/काढणी आणि विक्री करणे कालावधी एप्रिल २०२५ ते जुलै २०२५ मला/आम्हाला टेंडर फॉर्म सोबत असलेल्या सर्व नियम व अटी मान्य आहेत.

| अ.क्र. | उत्पादनाचे नाव | प्रति किलो दर | एकूण रूपये |
|---|---|---|---|
| १ | केशर आंब्याची फळे | | |

सोबत बयाणा रक्कम रू.२५,०००/- डि.डि.क्रमांक.................. दि. ............... बँक.......................... जोडला आहे.
कळावे,

आपला विश्वासू,

ठिकाण :
दिनांक :

सही :
संपूर्ण नांव :

**अटी व शर्ती :**

**२०२४–२५ वार्षिक स्वरूपातील आंबा विक्रीच्या ठेकेदारांसाठी करारातील अटी–शर्थी पुढील प्रमाणेः**

१. संबंधित ठेकेदाराने स्व:खर्चाने वार्षिक उक्त्या स्वरूपातील आंबा ची फळे झाडावरून काढणे व सर्व प्रकारची आंब्याच्या मळ्यातील देखरेख व मेंटेनन्स करणे आवश्यक राहील.

२. सदरील करारासाठी संबंधित ठेकेदाराने रू.५००/– चे मुद्रांक, आधार कार्ड, पॅन कार्ड इ. आवश्यक कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे.

३. वार्षिक उक्त्या स्वरूपातील आंबा विक्री कराराचा कालावधी दि. १५/०४/२०२५ ते दि. १५/०७/२०२५ असा असून सदर कराराची रक्कम रू................/– प्रती किलो (अक्षरी रू.............फक्त) इतकी असून, अनामत रक्कम रू........./– इतकी राहील व सदरील करारासाठी संबंधित ठेकेदाराने रू.५००/– चे मुद्रांक सोबत जमा करणे आवश्यक आहे.

४. संबंधित ठेकेदाराने वार्षिक उक्त्या स्वरूपातील आंबा विक्री करारा अंतर्गत सदर कालावधीत दि.१५/०४/२०२५ ते दि. १५/०७/२०२५ उपलब्धतेनुसार / पक्वतेनुसार / लहान–मोठा सर्व आंबा फळे विक्रीसाठी झाडावरून स्व:खर्चाने काढणे बंधनकारक राहील.

५. सदरील करारा उपरांत संबंधित ठेकेदाराने उक्त्या स्वरूपातील आंबा विक्रीची रक्कम द्विपक्षीय करार स्वाक्षांकन करतेवेळी त्वरित जमा करणे बंधनकारक राहील.

६. संबंधित ठेकेदाराने वार्षिक उक्त्या स्वरूपातील आंब्यांच्या रोपांचे व संस्थेच्या नायगांव व लोणारवाडी प्रक्षेत्रावरील मालमत्तांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान करता कामा नये, कोणतेही नुकसान झाल्यास त्याची योग्य ती नुकसान भरपाई संस्था ठरवील त्या प्रमाणे बंधनकारक राहील. त्यासंदर्भात मा. महासंचालक सो. वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, मांजरी बु. पुणे. यांचा निर्णय अंतिम असेल.

७. कोणत्याही नैसर्गिक तसेच भौतिक आपत्तींसाठी / अडचणीसाठी संस्था जबाबदार राहणार नाही.

८. द्विपक्षीय करारा उपरांत संबंधित ठेकेदाराच्या कोणत्याही प्रकारच्या नैसर्गिक, भौतिक तसेच चोरींच्या घटना /नुकसानींसाठी संस्था जबाबदार राहणार नाही.

९. संस्थेमार्फत संबंधित ठेकेदारास उपलब्धते नुसार फक्त पाण्याची उपलब्धता करण्यात येईल. गरजेनुसार आब्यातील पाणी व्यवस्थापनासाठी आवश्यक पाईप लाईन दुरूस्ती संबंधित ठेकेदाराने स्व:खर्चाने करावी.

१०.संबंधित ठेकेदाराने वार्षिक उक्त्या स्वरूपातील आंबा विक्री संदर्भातील वेळोवेळी घालून दिलेल्या लेखी/तोंडी अटी–शर्तीच्या अधीन राहून त्यांचे पालन करणे आवश्यक आहे.

११.कोणत्याही अटी–शर्तीचे उल्लंघन झाल्यास संस्थेमार्फत योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल व त्यासाठी येणा–या सर्व खर्चाची जबाबदारी संबंधीत ठेकेदाराचीच राहील.

१२.करारातील अटी–शर्तीचा भंग झाल्यास आठ दिवसांची नोटीस देऊन करार संस्थेमार्फत रद्द करण्यात येईल व त्यासंदर्भात मा.महासंचालक सो. वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, मांजरी बु.,पुणे यांचा निर्णय अंतिम असेल.